# फळबाग लागवडीसाठी खड्डा भरण्याची योग्य पद्धत

डॉ. आदिनाथ ताकटे

नवीन फळझाडांच्या लागवडीच्या नियोजित जागी योग्य त्या अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत. जमिनीचा मगदूर आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्यांचा आकार ठरवावा. हलक्या जमिनीत व मोठ्या विस्ताराच्या झाडासाठी मोठ्या आकाराचे खड्डे घ्यावेत. दीर्घायुषी झाडे असतील तर १ मी. × १ मी. × १ मी. आकाराचा खड्डा घ्यावा. मध्यम आकाराच्या झाडांना ७५ × ७५ × ७५ सेंमी आणि लहान झाडांना ६० × ६० × ६० सेंमी आकाराचे खड्डा घ्यावा. जमीन डोंगर उताराची असेल तर समपातळी रेषा काढून त्याप्रमाणे लागवड करावी. खात्रीशीर पाऊस झाल्यानंतरच फळझाडांच्या लागवडीचे नियोजन करावे.



फळझाडांच्या निवडीनुसार योग्य अंतरावर खड्डे काढून रोपांची लागवड करावी.

## फळबागेसाठी खड्डे भरणे

- खड्डा खोदताना वरच्या व खालच्या थरातील माती वेगवेगळी टाकावी. खड्डे काढल्यानंतर ते तीन आठवडे उन्हामध्ये चांगले तापू द्यावेत. जेणेकरून प्रखर सूर्यप्रकाशामुळे खड्ड्याचे निर्जंतुकीकरण होईल. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे पुन्हा भरावे.
- खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५ सें. मी. थरात भरावा.
- पोयटा माती, मातीमध्ये चांगले कुजलेले शेणखत २० ते २५ किलो अधिक गांडूळ खत २ ते ३ किलो अधिक निंबोळी पेंड २ ते ३ किलो अधिक टायकोडर्मा जिवाणू २५ ग्रॅम अधिक स्फुरद विरघळवणारे जिवाणू १५ ग्रॅम अधिक ॲझेटोबॅक्टर २५ ग्रॅम घेऊन मिश्रण तयार करून घ्यावे. या मिश्रणाने खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ सेंमी उंच भरून घ्यावा. म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीला फळझाडांची लागवड करता येईल.

## लागवडीची योग्य वेळ

खात्रीशीर पाऊस झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस जून महिना किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात लागवड करावी. अति पावसात किंवा पावसाच्या शेवटी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये फळझाडांची लागवड करू नये. पावसाच्या सुरुवातीस लागवड केलेल्या फळझाडांची चांगली समाधानकारक वाढ होते. ही लागवड काही कालावधीकरिता पाण्याचा ताणही सहन करू शकतात. जून-जुलैपर्यंत वेळेवर झाडांची लागवड झाल्यास वाढ जोमाने होते. लागवडीसाठी खात्रीशीर रोपवाटिकेतून कलमे किंवा रोपांची खरेदी करावी.

### विविध फळझाडांच्या लागवडीचे अंतर

| फळझाड | लागवडीचे अंतर (मीटर) | हेक्टरी झाडे |
|---|---|---|
| आंबा | १० × १० | १०० |
| चिकू | १० × १० | १०० |
| चिंच | १० × १० | १०० |
| जांभूळ | १० × १० | १०० |
| नारळ | ७.५ × ७.५ | १७७ |
| आवळा | ७ x ७ | २०४ |
| पेरू | ६ × ६ | २७७ |
| | ३ × २ | १६६६ |
| बोर | ६ × ६ | २७७ |
| लिंबू किंवा मोसंबी | ६ × ६ | २७७ |
| सीताफळ | ५ × ५ | ४०० |
| डाळिंब | ४.५ × ३ | ७४० |
| अंजीर | ५ × ५ | ४०० |
| | ४.५ × ३ | ७४० |

डॉ. आदिनाथ ताकटे,
९४०४०३२३८९
(मृदा शास्त्रज्ञ, एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)

छोट्या जाहिराती
व्यवसायवृद्धीचा मार्ग

क्लासिफाइड
सहा ओळींसाठी फक्त ५०० रुपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना:
२ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १० पेड + १२ फ्री

अवजारे / यंत्रसामग्री

अवजारे / यंत्र खरेदी

अफार्मद्वारा सातारा, धाराशिव, लातूर, नाशिक, धुळे, नंदुरबार व पुणे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी फळरोपे, सूक्ष्म सिंचन संच, गांडूळ व जिवाणू खते, शेडनेट, प्लॅस्टिक ड्रम, शेती औजारे इ. खरेदीसाठी अधिकृत पुरवठादारांनी 15 मे 2024 पर्यंत programdirector@afarm.org या इमेलवर दर पाठवावे. निविदा फॉर्म www.afarm.org/events या लिंक वर उपलब्ध. मो.- 9881496501.

बी - बियाणे

बियाणे / रोपे विक्री

जलसिंचन

बोअरवेल्स

पाटील ॲग्रो इंजिनिअर्स पुणे नवीन विहीर बोअरवेल्ससाठी तीन मशिन्सद्वारे भू-जल संशोधन मोबा. : ९८५०३७१४१३.

त्वरा करा!! त्वरा करा!! त्वरा करा!! बोअरवेलचे पाणी वाढवणारे पेटंटेड तंत्रज्ञान फक्त ०८ हजार रुपयात. मराठवाड्यातील जिल्ह्यांसाठी मर्यादित योजना. प्रथम नोंदणी करणाऱ्या ५०० शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात सेवा. संपर्क: 8956960567 / 8956960566.

जमीनविषयक

जमीन खरेदी

5 एकर शेतजमीन शेती करण्यासाठी विकत घेणे.

पशुधन व्यवसाय

पशुखाद्य

अफार्मद्वारा सातारा, धाराशिव, लातूर, नाशिक, धुळे, नंदुरबार व पुणे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी चारा बियाणे, मुरघास / ॲझोला बॅग, शेळी, पशुखाद्य, औषधे, कोंबडी पिल्ले, मुराडे खरेदीसाठी अधिकृत पुरवठादारांनी १५ मे २०२४ पर्यंत programdirector@afarm.org या इमेलवर दर पाठवावे. निविदा फॉर्म www.afarm.org/events या लिंक वर उपलब्ध. मो.- 9881496501

नोकरीविषयक

नोकरी देणे

संपूर्ण महाराष्ट्रात नामवंत